

# राजहंस

नदीच्या गाळात आणि तुझ्या प्रेमात
दोन्हीत एकदाच ‘पडणं’ आहे,
कितीही झगडलं तरी
नंतर फक्त ‘बुडणं’ आहे

राजन राजे

# राजहंस

राजन राजे

प्रकाशक : सौ. नलिनी रघुनाथ राजे
लोकपूरम, नूपुर
A-II / 006 , ऑफ् पोखरण रोड नं. २,
ठाणे ४०० ६०१. ✆ ५३३४०४६,
५३३३५६५, ५३३६६४३.

© राजन रघुनाथ राजे

गावचा पत्ता : मौजे–साखरे, ता. मुरबाड (जि. ठाणे).

प्रथमावृत्ती : १६ जून १९९५

निर्मिती सहाय्य : संजय देशमुख / राजेश पाटील
C/o खिमलाईन पंप्स् लि.
दिघा, नवी मुंबई.

रेखाचित्रे : संजय देशमुख

मुद्रक : सन्मिका क्रिएशन्स्
४ छाया, सिव्हिल हॉस्पिटलजवळ,
ठाणे, ✆ ५३३६०७४.

अक्षरजुळणी : निर्मिती कॉम्प्युटर्स ✆ ५४२१६४७.

किंमत : रु. २०/–

## चार ओळी

अनिल थत्तेंच्या 'गगनभेदी' तील काव्यस्पर्धेच्या निमित्तानं एका अनामिक, पडदानशील, काव्यात्म तरीही विलक्षण गूढरम्य व्यक्तित्वाशी मी संवाद साधला, तो त्या व्यक्तित्वाला—त्यातल्या 'तिला' प्रेरित करुन 'लिहितं' करण्यासाठी! पण संवाद अचानक थांबला, काळ थोडा थबकला आणि एक दिवस अचानक मला उमगलं ते हे की, या व्यक्तित्वात विलक्षण जादू आहे 'प्रेरणा' देण्याचं जबरदस्त सामर्थ्य आहे आणि.......

*" कुणाला प्रेरणा देता देता*
*स्वतःच प्रेरणा घ्यावी*
*शब्दांना शोधता शोधता*
*कवितांची माळ व्हावी "*

अशी शब्दशः माझी विद्युतभारित अवस्था झाली. मग 'तिचा' भन्नाट वेध घेत तिचे 'मूडस्' टिपणं अगदी ओघानंच झालं. भरीस भर म्हणून निसर्ग खुणावत राह्यला. कधी अगतिक—हताश तर कधी प्रभातीचा प्रसन्न प्रकाश! सोबतीला 'सामाजिक व्यथांची जाणीव' माझ्या खनपटीला बसलेली. मग तिचंही प्रतिबिंब पानोपानी साकारलं. आणि या मंथनातून एक 'रसायनं' बनलं 'राजहंस' काव्य पुष्पांजलीचं!

जाता जाता एवढचं म्हणावसं वाटतं...

*" कुणाही एका रसिक हृदयाची तार छेडण्याचं बळ*
*जर या काव्यसुरावटीत असेल*
*तर माझ्या सारखा भाग्यवान*
*या जगती कुणी नसेल !!! "*

माझं आराध्य दैवत,

।। शिवछत्रपतींच्या पावनचरणी समर्पित ।।




हार्दिक शुभेच्छा

खिमलाईन पंप्स् मित्र मंडळ,दिघा. नवी मुंबई.

चरई मित्र मंडळ, ठाणे.

लोकपूरम मराठी मित्र मंडळ, ठाणे.


आपल्या प्रत्येकाच्या मनात एक कवितेचा पक्षी आहे
तुमचा माझा मिळून पक्ष्यांचा एक घोळका आहे.
फक्त तुमचा पक्षी अबोल तर
माझा पक्षी बोलका आहे –"




स्वप्न आणि सत्य
यात फरक एवढाचं आहे
एक पापणीत दडतं
दुसरं पापणी उघडतं



नांगराचं फाळ जमिनीच्या
पोटात शिरताना तिला म्हणालं,
माझं झिजणं व्यर्थ मी जाणलं,
पण येताना तुझ्यासाठी गर्भारपण आणलं !'





मेघांनी बरसायलाचं हवं असं
पृथ्वीचं म्हणणं नाही
सावली दिली तरी बस्स्
पावसासाठी कण्हणं नाही


तुझ्या प्रतिक्षेत 'त्या' खडकाला
मी पाझरताना पाह्यलं
मग माझी काय कथा –
मला त्यानं झुरताना पाह्यलं




मृदगंधाला म्हटलं, जरासा थांब
आल्यापावली जाणं, हे कसलं जीणं ?
मृदगंध म्हणाला, ' काम माझं झालयं,
मी पावसाला मातीत रुजवलयं'



हृदयाच्या वेशीवर
एक कुंपण मी घातलयं
तुझा प्रवेश रोखण्यासाठी
त्यात माझं 'मी पण' भरलयं




मुंगुसाशी लढताना
जीव आपला जाणार आहे
एवढं माहीत असूनही
साप अखेर लढणार आहे




जंगलातल्या वणव्यात
पक्षी जाती नभात
पिल्लं बापडी घरट्यात
आगीच्या लपेट्यात



तू आलीस तेव्हा भुंग्याला
चाफ्याचं अवघ्राण करताना पाहृयलं
तू गेलीस तेव्हा चाफ्याला
मी प्राण सोडताना पाहृयलं




उंटाचं पोट फाडून किंवा
शहाळ्याची मान चिरुन
माणसाची तहान भागेना
मग जीव कुणाचा का जाईना !



विहीरींच्या घशाची कोरड
न सांगताच समजली आहे
झिजलेल्या तळव्यांवरुन
आपसूक मी जाणली आहे



अखेरच्या भेटीत आज तू
गजरा विसरुन गेलीस
परत करु म्हटलं तर
फुलंच गळून गेलीत




काळ्या ढगांनी पावसात
गाणी गाऊन पहावं
वाऱ्यानं घुसळताच
पांढऱ्यानं लोणी व्हावं !




निसर्ग नियमांचं 'क्रिझ' सोडताना
एक निश्चित होणार आहे,
माणूस असाच केव्हातरी
'यष्टिचित' होणार आहे







आज तुला स्मरणं,
रोज नवं मरणं आहे
दोन मरणांच्या जगण्यामधलं
तुझ्यासाठी झुरणं आहे



सूर्यानं उगवती न् मावळतीच्या
किरणात फरक आणला आहे
एकात आदि न् दुसऱ्यात अंत
हा फरक मी जाणला आहे




द्रव्यसंचय करताना माणसं
अमर असल्यागत वागतात
आणि मरण समोर आलं
की, कण्यामधुन वाकतात



तु म्हणतोस तशी, मी दगडाची पुतळी नाही
तुझ्या गुणांवर मी खरचं लुब्ध आहे
पण माझ्याच काही दोषांमुळे
आजही मी स्तब्ध आहे




विझलेल्या दिव्याला
तेला पेक्षा वात द्यावी
तेल कसंही, कुठेही जळतं
वातीचं नातं फक्त ज्योतीशी जुळतं




तुझ्या नजरेच्या तीरानं
हृदय घायाळ व्हायची धास्तीच नाही
कारण अलिकडच्या काळात
त्याची माझ्याकडे वस्तीच नाही



मित्र–सोयरे आपल्यासाठी
घर बांधू म्हणतात
पण हलकेच आपल्यासाठी
कबर खणून ठेवतात






कवितेसाठी तू केवळ शुभेच्छा पाठवल्यानंही
केवढे बळ मिळून गेले
पाहता पाहता पाटीवरले
वळ सारे गळून गेले

येशू, बुध्द, राम, कृष्ण
येथे आले आणि गेले
रावण आणि कंस मात्र
जायचेच राहून गेले




आठवतयं तुझ्या साथीनं शिशिर
पालवीनं झुकला होता
तुझ्याविना वसंत माझा
पालवीला मुकला होता






परवा या हातानं दंगलीत
एक निष्पाप जीव वाचला
कालच्या दंगलीत मात्र
तो हातच कापला गेला

पहाटेच्या दुलईत
रात्र अजुन निजलेली
रतिसुखात न्हाऊनं
अंग अंग भिजलेली



मुखवट्यांशी रोज खेळता खेळता
चेहराच खरा हरवून गेला
तुझ्यावाचून जगता जगता
प्राणच माझा झिजून गेला




आज राहून राहून वाटतयं
तेव्हा मी बोलायला हवं होतं
पण ओठांच बंड करणं
मला खरचं नवं होतं






पत्थर आणि फूल
दोन्हीवर मालकी तुझीच आहे
एक तुझ्या हृदयात वसतं
दुसरं तुझ्या रुपात ठसतं




इथल्या सुपीक जमिनीत
जातधर्माचा वृक्ष खोल रुजलायं
हातानच त्याला उपटायचा म्हणतोय
थोडक्यात, हाताचा बळी द्यायचायं



चंदन जाळल्यावर जळतं
तेव्हाच ते लाकूड असल्याचं कळतं
एरव्ही गंधामुळे त्याचं
तुझ्या श्वासाशीच नातं जुळतं


गावातल्या झोपडीला फक्त
जगण्याची आस आहे
हसण्यात सुध्दा इथल्या
रडण्याचा भास आहे





गुलाबाच्या काट्याचं बोचणं
आणि प्रेमात ह्रदयाचं भंगणं
एक वेदना घेण्याची आहे
तर दुसरी देण्याची आहे –

विंचवाची मादी आई होण्यासाठी
मृत्यूचा हात धरते
जगण्याच्या इच्छेवरती
निर्मिती मात करते



भारत आपला देश
कुंपणांचा प्रदेश आहे
प्रत्येक कुंपणाबाहेर
जाती धर्माचा द्वेष आहे






तुला पुन्हा स्मरताना
आभाळ काळे भरुन आले
नको नको म्हणताना
डोळे पाण्यात बुडून गेले


जाडजूड भिंती उभारुन
माणूस किती सुरक्षित राहणार आहे
वणवा केव्हाचाचं पेटलायं
तो सिमेंटलाही ग्रासणार आहे





माझ्यातला कोलंबस
शिडात हवा भरणार आहे
तू नाकारलसं तरीही
किनाऱ्यास तुझ्या लागणार आहे

निर्मम मानवाच्या माथ्यावरचं
सावलीचं ओझं पेलताना
वृक्षानं थोडं कठोर व्हावं
कु-हाडीचा घाव झेलताना





एक दिवस असा येतो
पावसानं भिजून जातो
भिजता भिजता आठवणींना
कोंब नवे देऊन जातो

प्रत्येकाच्या जीवन प्रवाहात
एक भोवरा लपला आहे
प्रवेश आपला होतोय कधी
पाहण्यासाठी टपला आहे




तू नव्हतीस तेव्हा
रातराणीनं शीण हलका केला
तू न दिसताच पहाटे
पक्ष्यांनी गलका केला



पाऊस मातीलाच नव्हे
मनालाही भिजवतो
कोंब केवळ मातीत नव्हे
मनातही एक उगवतो




अन्न, वस्त्र, निवारा
देणारे भेटतात, भेटतील
पण अश्वत्थाम्याचा दाह शमविणारे
सांगा मला कुठे भेटतील ?



अश्वत्थाम्याला आता
वेदना सोसणं भाग आहे
तेल द्यायचं म्हटलं तरी
तेल तसं महाग आहे



महागाईच्या या दिवसात बकासूराचं सोडा,
सुदाम्याचंही पोट भरणं अशक्य आहे
महालाच्या किंमतीत फक्त
झोपडीचं घेणं शक्य आहे



मी एकटा असलो की,
माझा माझ्याशीच संवाद होतो
तू चिकटून बसलीस की,
दोघांमध्ये वाद होतो



संसार नशिबी नव्हता
म्हणूनच तर प्रेम टिकून राह्यलयं
कारण परवा लैला–मजनूला
मी घरात भांडताना पाह्यलयं




ओठात येण्यापूर्वी
गाणं खरं मनात असतं
कोकीळं कुठंही गायली तरी
गाव तिचं रानात असतं




पहिल्या वहिल्या रात्री
तुला फुलताना पाह्यलं
आणि रातराणीचं गुपित
तुला सांगायचचं राह्यलं



तुझ्याविना जगणं
म्हंजेच तुला स्मरणं आहे
नाहीतर तसं जगणं म्हंजे
जगण्याचा अभिनय करणं आहे




धूर–धक्के झेलतं कडेची झाडं
तग धरुन राहतात
वादळाचं एक निमित्त होतं
मग रस्त्यावर आडवी होतात




मी तुझी, तू माझा
म्हणता म्हणता
मी त्याची, तू तिचा
श्वास अडला, जाणता जाणता



तुझ्या स्मृतिंच्या गावची वेस ओलांडताना
अरे, हो, तुला एक सांगायचयं
वणव्यात पोळलेल्या झाडाला
पुन्हा नव्यानं अंकुरायचयं ——



सौंदर्य फुलाचं जरी तुझं
हृदयी दगडाचं काठिण्य आहे
पण दगड विरघळवणारं रसायनं बनवायचं
माझ्यात चांगलच प्राविण्य आहे




थकलो कितीही, तरी तुझ्या आठवणींच ओझं
खाली ठेवणं मला अशक्य आहे
हवचं तर चार–दोन आठवणी तुला
उसन्या देणं, एवढचं मला शक्य आहे



तुझा निरोप घेताना
अखेरची मी सजणार आहे
रोपटं एक सुकण्यापूर्वी
अखेरचं फुलणार आहे





पावसाचं लोभसं रुपडं वळून वळून पाहताना
प्रकाशाचे सप्त रंग
आपलाच मेळ भुलतात
नी आसमंतात, इंद्रधनूची कमान टाकतात


मला केव्हाचं तुझ्यात यायचयं
पण पायांनी चालणचं नाकारलयं
म्हणून निदान लिहावं तुला म्हणतेयं
तर हातानं 'न' लिहिण्याचं व्रत स्विकारलयं



पांढऱ्या ॲपरनं आड दडलेलं
डॉक्टरी पेशाचं काळ रुप पाहतो
तेव्हा शंभर वेळा चाचपून मी
आपलीच 'किडनी' तपासतो



बाबासाहेबांना केवळ
दलितांचा नेता म्हणणं
म्हंजे कोहिनूराच्या हिऱ्याला
अंगठीत कोंडून टाकणं




चिमूटभर सुखाच्या साथीनं
पसाभर दुःख भोगणं होतं
मरणाच्या लाचार भितीनं
जगण्याचा विचार करणं होतं





माझ्या हृदयात तुझी तस्वीर आहे
एरव्ही खळाळणारी, त्यात तू स्तब्ध आहेस
डोळ्यांना तुझ्या खूप बोलायचयं
पण ओठात तू निःशब्द आहेस

हिंस्त्र पशूंच्या भितीनं
माणसानं जंगलं तोडली
तेव्हा सिमेंटच्या जंगलात राहू म्हटलं तर
माणूस नावाच्या पशूची भिती वाढली



माझ्या मनात कवितांचे पक्षी
हळूच दडलेले असतात
तू यायचाच अवकाश,
त्यांनी पंख उघडलेले असतात



आठवतं तुला,
तू मनात भरलीस
तेव्हाच एक वेदना,
काळजात पेरलीस!




चातकाची थेंबाची प्रतिक्षा सुरुच आहे,
काळया मेघांना स्मरुन
कुणी सांगायच त्याला, मेघांचा,
गर्भपात होणारच नाही, हे कशावरुन ?




माझ्या संमतिवाचून तू हृदयात घर बांधत गेलास
हे बांधकाम अनधिकृत होतं
कुदळी, फावडी जमवूनही उपयोग शून्य कारण
फितूर हृदयालाच ते तसं स्वीकृत होतं






वैशाखाच्या वणव्यात माझा
कवितेचा कोंब जळताना
हात तुझे दुखले असतील
संतत धार धरताना


कधी कधी आपलंच रक्त
आपल्याला फसवतं
आणि रामाच्या पोटी
एखादा रावण प्रसवतं





तुझं स्वप्नात येऊन छळणं थांबेना
तेव्हा मी जागचं राह्यचं ठरवले
पण फितूर डोळें जागेपणीचं
स्वप्न पाह्यला सरावले

मी शूरवीर आहे, असं कधी म्हटलचं नाही
पण श्रध्देच्या काठावरुन चालताना
कसलीही भिती वाटून घेणं
मनाला कधी पटलचं नाही



तुझ्यासाठी गुलाब जवळ करताना
काटा रुतण्यास माझी ना नाही
रक्त ठिबकल्याचा दोष
तुझ्या माथी देणं नाही




तुझ्या किल्ले हृदयाचं द्वारं किलकिलं करणं
बाब तशी क्षुल्लक आहे
तो किल्लाच सर करायचा म्हणतोयं
तेवढा जोर शिल्लक आहे




तलम कोमल वस्त्रासाठी
आधी रेशीम कीडे पाळतात
रेशीम हाती येताच त्यांना
गरम पाण्यात पोळतात




पानांनी डंवरलेला आम्रवृक्ष
आणि फळं झडलेली
तुझं जीवन फळण्यासाठी
मी माझीच पालवी खुडलेली



टाकीचे घाव सोसताना
एकदा दगडाला वाचा फुटली –
"देव मी व्हायचं न् तुम्ही दानवच राह्यचं ?
सांगा, ही रीत कुठली ?"





माझ्या रंगमंचावर प्रवेश तुझा
नव्या प्रयोगाची नांदी आहे
मनात साचली धूळ उधळणारी
एक सृजन आँधी आहे

वाढत्या वयानं थकणाऱ्या देहाशी
मनानं बंड पुकारलयं
पांढऱ्या केसांच्या रानात
हिरवं निशाण उभारलयं





काल तू जखमेवर हळूच
एक फुंकर मारलीस
पण चुकुन एक जखम नवी
जन्माला घातलीस

कट्टर धर्मियांचा धर्म
दुसऱ्याला मारण्याचा आहे
विश्वातल्या माणुसकीला
वेठीला धरण्याचा आहे




तुझ्या स्मृतिंची पाखरं
फार म्हंजे फारच द्वाडं झालीत
मी सारखी पिटाळते म्हणून
माझ्या काळजाच्याच आड लपलीत






तू माझाच हो,
असा माझा हट्ट नाही
मीच तुझी होतेय
बघ, मी तशी मठ्ठ नाही


नदी समुद्राला मिळते म्हणून
निसर्गामध्ये खाडी बनते
घर घराला भिडते म्हणून
माणसांमध्ये वाडी बनते




हृदयापेक्षा मेंदूवर
माझा भर राहाणार आहे
हृदय नुसतचं धडकणारं
मेंदू तुला स्मरणारं आहे



पूर्वी डोंगर जमिनीचे
आधार भले
सुरुंग लागल्यापासून
लाचार झाले



आंदोलनासाठी पांढरपेशे पुढं रेटतात
तेव्हा मी मागे वळून पहात नाही
मागं वळून पहावं तर
मागं कोणी रहातं नाही



कवितेची भावुकता आणि गेयता यांचा हृदयानुभव घेणारा रसिक वाचक हा मुळात स्वतःच लाव्ह्यासारखा आतून तप्त तरी वरुन सुप्त अशा स्वरूपाचा अप्रकट कवि असतो, ही संकल्पना मनातल्या कवितेला अभावितपणं 'पक्षीरूप' देऊन गेली. मग असंख्य रसिक मनांच्या ढोलीतले दूर दडून बसलेले पक्षी स्वर्गीय स्वरांनी छेडले जाऊन बाहेर डोकावते झाले -- स्वरात स्वर मिसळले. असंख्य पक्ष्यांचा किलबिलाट कानात घुमायला लागला. त्यात माझाही पक्षी हिरीरीने सामील झालेला. ते त्रयस्थपणं पहात शुभारंभालाच मी लिहिलं . . .

*" आपल्या प्रत्येकाच्या मनात कवितेचा एक पक्षी आहे*
*तुमचा माझा मिळून पक्ष्यांचा एक घोळका आहे,*
*फक्त तुमचा पक्षी अबोल*
*तर माझा पक्षी बोलका आहे ----- "*

त्यानंतर ज्योतीनं ज्योतं पेटली, अवघा अंधार उधळत गेली !!!

-- *राजन राजे*